बिगर अल्पसंख्यांक शाळांचे व्यवस्थापन अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांकडे हस्तांतरीत झाल्यानंतर शाळेचा दर्जा निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण- ११२६/प्र.क्र.२६०/एस एम-१
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १५ जुलै , २०२६.

वाचा :

शासन निर्णय क्र.माशाह/२०११ /(२१०/११)/माशि-३, दि.१७ फेब्रुवारी, २०१२

प्रस्तावना :

संदर्भाधिन शासन निर्णयान्वये शाळा चालविणाऱ्या शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापनातील बदलाबाबतच्या अटी व शर्ती तसेच कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. या शासन निर्णयानुसार बिगर अल्पसंख्यांक समुदायाने स्थापन केलेल्या शाळेचे व्यवस्थापन अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेकडे तसेच अल्पसंख्यांक समुदायाने स्थापन केलेल्या शाळेचे व्यवस्थापन बिगर अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेकडे परस्पर सहमतीने करण्यास मान्यता आहे. ज्यावेळी बिगर अल्पसंख्यांक शाळेचे व्यवस्थापन अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेकडे वर्ग केले जाते, त्यानंतर त्या शाळेस अल्पसंख्यांक शाळेचा दर्जा आपोआप प्राप्त होतो किंवा कसे या बाबत क्षेत्रियस्तरावर काहिसा संभ्रम असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३० (१) अन्वये अशी तरतूद करण्यात आली आहे की, “धार्मिक किंवा भाषिक अल्पसंख्यांकांना त्यांच्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा अधिकार असेल.” सदर तरतूदीवरून असे स्पष्ट होते की एखाद्या शाळेस अथवा शैक्षणिक संस्थेस अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त होण्यासाठी ती शाळा अथवा शैक्षणिक संस्था धार्मिक अथवा भाषिक अल्पसंख्यांक समुदायाने स्थापन करणे व त्याचे प्रशासन करणे या दोन्ही अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे. दोन्ही अटींपैकी केवळ एका अटीची पूर्तता होत असल्यास संबंधित शाळा अथवा शैक्षणिक संस्थेस अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त होत नाही.

बिगर अल्पसंख्यांक शाळांना तसेच अल्पसंख्यांक शाळांना ज्यावेळी मान्यता दिली जाते, त्यावेळी स्थानिक परिस्थिती, लोकसंख्येचा सामाजिक- आर्थिक स्तर, दळणवळणाची साधने, त्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अध्ययन विषयक गरजा इत्यादी बाबी विचारात घेतल्या जातात. या दोन्ही प्रकारच्या शाळांना मान्यता देण्याबाबतचे निकष व त्यांचे प्रशासन करण्याबाबतचे नियम भिन्न-भिन्न आहेत. त्यामुळे केवळ व्यवस्थापनाचे हस्तांतरण झाल्याच्या कारणावरून एखाद्या बिगर अल्पसंख्यांक शाळेस अल्पसंख्यांक शाळेचा अथवा शैक्षणिक संस्थेचा दर्जा प्राप्त होत नाही.

बिगर अल्पसंख्यांक शाळा ही स्थापनेच्या वेळीच बिगर अल्पसंख्यांक म्हणून स्थापन झालेली असते. स्थापनेबाबतची सदर शाळेची ही वस्तुस्थिती कधीही बदलत नाही. वर उल्लेख करण्यात आल्याप्रमाणे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०(१) अन्वये अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांना जे संरक्षण प्रदान करण्यात आले आहे, ते संरक्षण केवळ स्थापनेच्या वेळी अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था म्हणून स्थापन झालेल्या शाळांना अथवा संस्थांना लागू आहे.

शाळांच्या व्यवस्थापन हस्तांतरणाच्या अनुषंगाने क्षेत्रियस्तरावर असलेल्या संभ्रमाच्या अनुषंगाने स्पष्ट सूचना निर्गमित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

शासन निर्णय :

संदर्भाधिन शासन निर्णयातील तरतूदीनुसार ज्यावेळी एखाद्या बिगर अल्पसंख्यांक शाळेचे अथवा शैक्षणिक संस्थेचे व्यवस्थापन अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेकडे हस्तांतरीत केले जाते, त्यावेळी हस्तांतरीत होणाऱ्या शाळेच्या अथवा शैक्षणिक संस्थेच्या बिगर अल्पसंख्यांक दर्जात कोणताही बदल होणार नाही. व्यवस्थापन हस्तांतरणानंतरही सदर शाळा अथवा शैक्षणिक संस्था बिगर अल्पसंख्यांकच राहत असल्याने या शाळेस अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांना असलेले संरक्षण प्राप्त होणार नाही. हस्तांतरणापूर्वी सदर शाळेस असलेला बिगर अल्पसंख्यांक दर्जा हस्तांतरणानंतरही कायम असेल.

२. सदर शासन निर्णय विधि व न्याय विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्र. १३५/ई-फाईल/सिव्हिल/२०२६/अ शाखा, दिनांक २२.०६.२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या त्या विभागाच्या अभिप्रायानुसार व सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

३. अल्पसंख्यांक विकास विभागाच्या याबाबतच्या धोरणात कोणत्याही स्वरूपाची विसंगती असल्यास त्या विभागाने सदर विसंगती दूर करून सुधारित धोरण लागू करण्याबाबतची कार्यवाही करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७१५११५७५६६४४९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SAMEER ANANT SAWANT

Digitally signed by SAMEER ANANT SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT.,
2.5.4.20=57b66327fd02392673b4ab4d6a85fdd38e27f3be70b7a6bddc9bea3f08d2330b, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF01D0AB2AFFB124678E1A586450069BBD9E2CBC928A89E57C1B37706CB9F428, cn=SAMEER ANANT SAWANT
Date: 2026.07.15 11:59:41 +05'30'

(समीर सावंत)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क व इतर) यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
५) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
९) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
१०) मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
११) मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
१२) मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य (सर्व)
१३) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१४) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
१५) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६) शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक/योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे

१७) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक

१८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

१९) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक/योजना)

२०) सर्व गट शिक्षणाधिकारी/ शिक्षण निरीक्षक

२१) मान्यता प्राप्त सर्व खाजगी शाळा व्यवस्थापनाचे अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक

२२) निवड नस्ती- एस एम-१